

**मुकुल माधव फाउंडेशनतर्फे सायक्लॉथॉनचे आयोजन करण्यात आले. या वेळी पत्रकारांशी संवाद साधताना रितू छाब्रिया, राकेश बक्षी आणि राम धिल्लाँ.**

# मुकुल माधव फाउंडेशनतर्फे सायक्लॉथॉनचे आयोजन

**पुणे :** दुर्बल घटकांना मदत करण्यासाठी मुकुल माधव फाउंडेशनतर्फे ८ डिसेंबर ते १२ डिसेंबर दरम्यान पुणे ते रत्नागिरी सायक्लॉथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाअंतर्गत अनेक कार्यक्रम होणार असून, त्यात बायसिकल एंजेलसच्या वतीने गरजू व्यक्तींना उपजीविकेसाठीच्या सायकलींचे वाटप करण्यात येणार आहे. फिनोलेक्स इंडस्ट्रीजच्या सहकार्याने एमएमएफ शिरवळ, उंब्रज, कोकरूड आणि पाली येथील चार जिल्हा परिषद शाळांमध्ये वैद्यकीय शिबिरांचे आयोजन करणार आहे.

बायसिकल एंजेल्सचे संस्थापक राकेश बक्षी आणि प्रसिद्ध इएनटी सर्जन प्रा. राम धिल्लाँ हेदेखील या सायक्लॉथॉनमध्ये सहभागी होणार आहेत. त्याशिवाय आरोग्य शिबिरामध्ये २० हून अधिक डॉक्टरांचे पथक सामील होणार असून, त्यात केईएम इस्पितळातील पेडियाट्रीक विभागाचे पथक, भारती हॉस्पिटलच्या ऑडियोलॉजी, स्पीच व डेंटल विभागाचे पथक आणि एच. व्ही. देसाई आय हॉस्पिटलमधील नेत्ररोग विभागाचे पथक यांचा समावेश आहे. मुकुल माधव फाउंडेशनच्या संनियंत्रणाखाली असलेल्या ३१७१ मुलांची या वेळी हे डॉक्टर तपासणी करणार आहेत.

फाउंडेशन या वेळी सातारा, सांगली आणि रत्नागिरी या तिन्ही जिल्ह्यांतील सर्व ३१७१ विद्यार्थ्यांना हायजीन हॅम्पर्स पुरविणार असून यात एक टूथब्रश, टूथपेस्ट, साबण, बिस्कीट आणि फ्रूटीचा समावेश आहे.

या उपक्रमामागची संकल्पना स्पष्ट करताना एमएमएफच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितु छाब्रिया- म्हणाल्या, वंचितांना वितरित केलेल्या सायकलींच्या माध्यमातून त्यांना उपजीविका मिळण्याच्या संधी वाढविण्यास मदत करून त्यांचे सशक्तीकरण करणे, हा या प्रकल्पामागचा दृष्टिकोन आहे. सायक्लोथॉनच्या दरम्यान आम्हाला सेरेब्रल पाल्सीने ग्रस्त मुलांबाबत कळले. अनेक मुले शारीरिक विकलांगतेमुळे शाळांपासून दूर राहतात. अशा विशेष मुलांना वर्गात नीट बसण्यासाठी विशेष खुर्च्या लागतात. ही गरज पूर्ण करण्यासाठी सातारा जिल्हा परिषदेने मदतीसाठी एमएमएफला विनंती केली होती. जानेवारी २०१६ पर्यंत फिनोलेक्स इंडस्ट्रीजच्या साहाय्याने एमएमएफ ही विनंती पूर्ण करेल आणि १०० विशेष मुले या खुर्च्या वापरून शाळेत नियमित उपस्थित राहू शकतील, असे त्या म्हणाल्या.